**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८**
**ब प्रभाग समिती, चिंचवड ४११ ०३३**
**सभावृत्तांत**
**कार्यपत्रिका क्र. ९**

दिनांक :- १९/११/२०१४ वेळ :- दु. २.३० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब प्रभाग समितीची मासिक सभा बुधवार दिनांक १९/११/२०१४ रोजी दु. २.३० वा. ब प्रभाग कार्यालयाचे छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजित करणेत आली. प्रस्तुत सभेस खालीलप्रमाणे सन्मा. नगरसदस्य उपस्थित होते.

१. मा. ओव्हाळ शेखर अशोक अध्यक्ष
२. मा.सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर
३. मा. शमीम पठाण
४. मा. अँड. चिंचवडे संदिप गुलाबराव
५. मा.चिंचवडे-पाटील आश्विनी गजानन
६. मा.को-हाळे अनंत सुभाष
७. मा. जगताप विमलताई सुरेश
८. मा.पवार अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा
९. मा.गायकवाड विनय उर्फ विनायक रमेश
१०. मा.कलाटे स्वाती मयूर

खालील प्रमाणे अधिकारी / कर्मचारी उपस्थित होते.

मा.क्षेत्रिय अधिकारी – सुभाष माछरे, मा.प्रशासन अधिकारी तथा सचिव सभाशाखा - रविंद्र विष्णू जाधव, मा.कार्यकारी अभियंता – रविंद्र दुधेकर, मा.रामदास तांबे, - उप अभियंता के. डी. फुटाणे, सुधाकर कुदळे, एन. आर. निबाळकर, सी.बी.कोंडे, एम.एम.चव्हाण, व्ही.एन.देसले, लेखाधिकारी – इनामदार सहा. आरोग्याधिकारी - जे.एस. जानकर, जी.एस. देशपांडे, उद्यान - डी. एम. आढळे, आर. बी. चांदेरे इत्यादी.

------

सर्वप्रथम मा. सभाध्यक्ष ओव्हाळ शेखर अशोक यांनी उपस्थितांचे स्वागत केले व सभेचे कामकाजास सुरुवात केली.

तदनंतर मा.विमलताई जगताप यांनी पुढील प्रमाणे सुचना मांडली.

आज दिनांक १९/११/२०१४ रोजीची प्रभाग समितीची मासिक सभा, अनियमीत पाणीपुरवठा होत असल्याने दिनांक २४/११/२०१४ रोजी दुपारी १२.०० वाजेपर्यंत तहकुब करणेत यावी.

सदर सुचनेस मा.शमीम पठाण यांनी अनुमोदन दिले.

त्याप्रमाणे मा.सभाध्यक्ष शेखर ओव्हाळ यांनी आज दिनांक १९/११/२०१४ रोजीची प्रभाग समितीची मासिक सभा दिनांक २४/११/२०१४ रोजी दुपारी १२.०० वाजेपर्यंत तहकुब करणेत येत असल्याचे जाहिर केले.

सही/-
[ ओव्हाळ शेखर अशोक ]
अध्यक्ष
ब प्रभाग समिती, चिंचवड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
ब प्रभाग कार्यालय, चिंचवड ३३
जा. क्र. बप्र/२/कावि/ २०३ /२०१४.
दिनांक : १५ / १२ /२०१४

सही/-
प्रशासन अधिकारी तथा
सचिव( सभाशाखा )
ब प्रभाग समिती

प्रत
सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८**
**ब प्रभाग समिती, चिंचवड ४११ ०३३**
**सभावृत्तांत**
**( दिनांक १९/११/२०१४ रोजीची तहकुब सभा)**
**कार्यपत्रिका क्र. ९**

दिनांक :- २४/११/२०१४ वेळ :- दु. १२.०० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब प्रभाग समितीची मासिक तहकुब सभा सोमवार दिनांक २४/११/२०१४ रोजी दु. १२.०० वा. ब प्रभाग कार्यालयाचे छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजित करणेत आली. प्रस्तुत सभेस खालीलप्रमाणे सन्मा. नगरसदस्य उपस्थित होते.

१. मा. ओव्हाळ शेखर अशोक अध्यक्ष
२. मा.लोंढे गणेश नारायण
३. मा. शमीम पठाण
४. मा. अँड. चिंचवडे संदिप गुलाबराव
५. मा.को-हाळे अनंत सुभाष
६. मा.साबळे छाया जगन्नाथ
७. मा. जगताप विमलताई सुरेश
८. मा.पवार अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा
९. मा.पवार यमुनाताई रमणनाना

खालील प्रमाणे अधिकारी / कर्मचारी उपस्थित होते.

मा.क्षेत्रिय अधिकारी – सुभाष माछरे, मा.प्रशासन अधिकारी तथा सचिव सभाशाखा - रविंद्र विष्णू जाधव, मा.कार्यकारी अभियंता – रविंद्र दुधेकर, मा.रामदास तांबे, - उप अभियंता के. डी. फुटाणे, सुधाकर कुदळे, एन. आर. निबाळकर, सी.बी.कोंडे, एम.एम.चव्हाण, व्ही.एन.देसले, लेखाधिकारी – इनामदार सहा. आरोग्याधिकारी - जे.एस. जानकर, जी.एस. देशपांडे, उद्यान - डी. एम. आढळे, आर. बी. चांदेरे इत्यादी.

- - - - - -

सर्वप्रथम मा. सभाध्यक्ष ओव्हाळ शेखर अशोक यांनी उपस्थितांचे स्वागत केले व सभेचे कामकाजास सुरुवात झाली.

ठराव क्रमांक २६ विषय क्रमांक १

दिनांक २४/११/२०१४ विभाग – आरोग्य

सुचक – मा.शमीम पठाण अनुमोदक :- मा.यमुना पवार

संदर्भ :- क्षेत्रिय अधिकारी यांचेकडील पत्र क्र.बक्षेका/५/कावि/७६४/२०१४,
दिनांक १३/११/२०१४

ब क्षेत्रीय कार्यालय कार्यक्षेत्रातील औष्णीक धुरीकरण कामकाजासाठी डिझेलवर रिक्षा टेम्पो भाडयाने घेणेबाबत संबंधीत आरोगय निरिक्षक व मुख्य आरोग्य निरिक्षक यांचा अहवाल आलेला आहे.

सदर अहवालानुसार औष्णीक धुरीकरण कामकाजासाठी डिझेलवर रिक्षा टेम्पो भाडयाने घेणेबाबत १ दिवसासाठी १डिझेल रिक्षा टेम्पो भाडयाने घेणेबाबत र.रु.८००/- इतका दर दिलेला आहे.

आरोग्य निरिक्षक व मुख्य आरोग्य निरिक्षक यांनी दिलेल्या अहवालातील अंदाजपत्रकानुसार ब क्षेत्रीय कार्यक्षेत्रातील औष्णीक धुरीकरण कामकाजासाठी वाहन भाडयाने घेणेबाबतनिविदा कामकाजासाठी १ नियमीत डिझेल तीन चाकी वाहनासाठी अंदाजे ३०० दिवसासाठी र.रु.८००/- प्रमाणे २,४०,०००/- व २ डिझेल तीन चाकी वाहनासाठी र.रु.८००/- प्रमाणे ४,८०,०००/- असे एकूण रक्कम रुपये ७,२०,०००/- इतका खर्च सन २०१४-२०१५ व २०१५-२०१६ या सालाकरीता निविदेसाठी अंदाजे खर्च अपेक्षीत आहे.

सन २०१४-२०१५ करीता औष्णीक धुरीकरण कामकाजासाठी वाहन भाडयाने घेणेबाबत अंदाजपत्रकीय तरतुद र.रु.७,००,०००/- इतकी करणेत आलेली आहे. तसेच सन २०१५-२०१६ करीता रक्कम रुपये १२,००,०००/- इतकी तरतुद प्रस्तावित केलेली आहे.

सदर कामास प्रशासकीय मान्यतेकामी प्रस्ताव मा.प्रभाग समितीपुढे आला असता, मा..शमीम पठाण यांनी पुढीलप्रमाण् उपसुचना मांडली.

१. टेंडर काढतांना अधि क ३ धुरीकरण गाडया व अधि क ३ धुरीकरण यंत्रे (मशीन) विकत घेणे
२. कचरा उचलणेसाठी अधिक दोन ट्रक वाढविणे तसेच एक डंम्पर वाढविणे
३. आरोग्य विभागासाठी एक जे.सी.बी. स्थापत्य विभागाकडून वाढवून घेणे

सदरचा प्रस्ताव उपरोक्त उपसुचनांसह मान्य करणेत करण्यात आला.

सदरचा सभवृत्तांत कायम होण्याची वाट न पहाता कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक २७ विषय क्रमांक २

दिनांक २४/११/२०१४ विभाग – स्थापत्य

सुचक – मा.गणेश लोंढे अनुमोदक :- मा. विमलताई जगताप

संदर्भ :- मा.अध्यक्ष प्रभाग समिती .शेखर ओव्हाळ यांचे
दिनांक १३/११/२०१४ रोजीचे पत्र.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक ५२ पुनावळे सर्व्हे नंबर १२येथे पाण्याची टाकी मनपाने बांधलेली आहे. तसेच जागा ही नंदकुमार भोंडवे यांचे मालकीची आहे.

तरी सदर जागेस भोंडवे इस्टेट असे नामकरण करणेबाबतचा विषय रदद करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला. ----------

वरील प्रमाणे सभेचे कामकाज झाले मा.सभाध्यक्ष ओव्हाळ शेखर अशोक यांनी सर्व उपस्थि तांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहिर केले.

सही/-
[ ओव्हाळ शेखर अशोक ]
अध्यक्ष
ब प्रभाग समिती, चिंचवड

पिंपरी चिंचव महानगरपालिका,
ब प्रभाग कार्यालय, चिंचवड ३३
जा. क्र. बप्र/२/कावि/ २०४/२०१४.
दिनांक : १५ / १२/२०१४

सही/-
प्रशासन अधिकारी तथा
सचिव( सभाशाखा )
ब प्रभाग समिती

प्रत
सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.